ePaper
म्हणून माझी जिरवू नका : अजित पवारांच्या वक्तव्याची चर्चा



| वर्ष - 6 | अंक - 365 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दि. 26 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- सोसायट्यांना आमदार निधीतून मदत
- ‘नेमकचि बोला’ कोणती ‘विचारधारा’?
- उष्माघात, निसर्गचक्र आणि पर्यावरणीय संकट

# आंबेगावमध्ये राष्ट्रवादीचा देव ‘कोपला’!

## » देवदत्त निकम यांची बंडखोरी : 2024 च्या विधानसभेची तयारी?

।पुणे महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माजी गृहमंत्री आणि आंबेगाव तालुक्याचे आमदार दिलीप वळसे पाटील यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख असलेले देवदत्त निकम यांनी मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत बंडखोरी केली आहे. त्यांनी वळसे पाटील यांचा आदेश झुगारून बाजार समितीत वेगळं पॅनल उभं केले आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्यातील राष्ट्रवादीमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.**





विशेष म्हणजे, देवदत्त निकम २०२४ मध्ये आंबेगाव विधानसभा निवडणूक लढवणार असून, घराणेशाहीला बगल देत वळसे-पाटलांचा उत्तराधिकारी म्हणून लोकांसमोर जातील, अशीच रणनिती दिसत आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दरम्यान, पक्षविरोधी कारवाई केल्यामुळे निकम यांना पक्षातून हकलापट्टी करण्याच्या हालचाली देखील सुरू झाल्याची माहिती समोर आहेत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक ज्या दिवशी जाहीर झाली. त्यावेळीच पक्षाकडून निकम यांना उमेदवारी नाकारण्यात आली होती. मात्र, निकम यांनी आपली भूमिका मांडत आपण अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले. पक्षाच्या सर्व मी कारभारात सहभागी होतो. मात्र, मलाच उमेदवारी का नाकरण्यात आली असा सवाल करत निकम यांनी मनातील खंत बोलून दाखवली होती.

सन २००४ मध्ये वळसेंचे जिवलग मित्र शिवाजीराव आढळराव यांना लोकसभेत जावू न देण्याचे राजकारण वळसेंचे अंगलट आले आणि आढळराव यांची बंडखोरी झाली.

### राष्ट्रवादीला फटका बसणार...

» देवदत्त निकम हे वळसे पाटील यांचे निकटवर्तीय मानले जातात. १९९० पासून देवदत्त निकम हे वळसे पाटील यांच्यासोबत काम करत आहेत. आतापर्यंत त्यांनी निष्ठेने काम केले आहे. देवदत निकम यांनी बंडखोरी करण्यामागच्या चर्चांना आता उधाण आले आहे. देवदत्त निकम हे आमदारकीसाठी इच्छुक असून त्यांनी ही बंडखोरी करत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे देवदत्त निकम यांच्या बंडखोरीचा राष्ट्रवादीला आणि वळसे पाटील यांना फटका बसणार का? हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे.

### वळसेंना बंडखोरीचे ग्रहण कायमच...!

» सन २०१४ मध्ये निकमांइतकेचे गळ्यातले ताईत राहिलेले पुणे जिल्हा परिषदेचे माजे उपाध्यक्ष अरुण गिरे यांची बंडखोरी झाली. मधल्या काळात कात्रज संघाचे माजी उपाध्यक्ष व राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष हिंगे हेही गिरे यांचेसोबत जाण्याची कुणकुण राहिली. आता तर थेट निकम यांचेकडूनच बंडखोरी झाल्याने वळसेंसाठी ही बंडखोरी सोपी राहणार नाही. कारण त्यांचे उत्तराधिकारी म्हणून ठामपणे एकाचेही नाव पुढे दिसत नसल्याने सन २००४ पासून वळसे-पाटील यांना लागलेले बंडखोरीचे ग्रहण सन २०२४ मध्ये आंबेगाव-शिरुरमध्ये काय चमत्कार करणार त्याचीच लिटमस चाचणी म्हणजे आंबेगाव बाजार समितीची २८ तारखेची निवडणूक म्हणावी लागेल.

# गायरान जागांचा सार्वजनिक वापर हवा!

## »खासदार बारणे : महापालिका आयुक्तांना मागणी

।पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**रावेत येथील गायरान जागेवर उद्यान, मैदान, विकसित करावे अशी ग्रामस्थांची मागणी आहे. ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करुन ही गायरान जागा सार्वजनिक वापरासाठी ठेवावी. यातून योग्य तोडगा काढावा, अशी सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली. तसेच आकुर्डीतील खंडोबा मंदिरालगतची मोकळी जागा कुस्त्यांच्या आखाडासाठी राखीव ठेवण्याची सूचनाही त्यांनी केली.**

रावेत येथील गायरान जागा विकसित करणे आणि ग्रामस्थांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबत, तसेच आकुर्डीतील खंडोबा मंदिर परिसर विकसित करण्याबाबत खासदार बारणे यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत बैठक घेतली. शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, तुकाराम भोंडवे, मधुकर भोंडवे, दिवानजी भोंडवे, व्ही.एस.काळभोर, शंकरराव पांढारकर, वैशाली काळभोर, गोविंदराव काळभोर आदी उपस्थित होते. रावेत येथील 16 एकर जागा महापालिकेला हस्तांतरित झाली आहे.

### सकारात्मक निर्णय घेतला जाईल : शेखर सिंह

» आकुर्डीतील खंडोबा मंदिर देवस्थान आकुर्डी, निगडी परिसरातील नागरिकांचे ग्रामदैवत आहे. आकुर्डीत खंडोबाचे मंदिर बांधले आहे. मंदिराच्या लगत महापालिकेची मोकळी जागा आहे. या जागेवर यात्रा भरते. कुस्त्यांचे आखाडे होतात. वाहने पार्किंग केली जातात. महापालिकेने ती जागा देखभाल दुरुस्तीसाठी मंदिर समितीला द्यावी. कुस्त्यांच्या आखाडासाठी जागा राखीव ठेवावी, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली. याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. लवकरच प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्याची ग्वाही आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.



# नियमांना 'कात्रजचा घाट'!

## » 80 टक्के वाहनांकडून अतिवेगाचा कहर, RTOकडून माहिती उघड

।पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई-बेंगळुरू महामार्गावर साताऱ्याकडून पुण्याकडे येणारी ऐंशी टक्के वाहने कात्रजचा नवीन बोगदा ते नवले पुलादरम्यान अतिवेगात धावत असल्याचे 'प्रादेशिक परिवहन विभागा'च्या (आरटीओ) रस्ता सुरक्षा विभागाने केलेल्या अभ्यासात दिसून आले आहे. त्यासाठी विभागाने भूमकर चौक परिसरात 'स्पीड गन'ही बसवली होती.**



भरधाव वेगातील मालवाहू ट्रकची खासगी प्रवासी बसला धडक बसून झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी मध्यरात्री घडली. कात्रजचा नवीन बोगदा ते नवले पूल या दरम्यान विविध उपाययोजना करूनही अपघातांना 'ब्रेक' लागलेला नाही. 'आरटीओ'च्या रस्ता सुरक्षा विभागासह 'सेव्ह लाइफ फाउंडेशन'नेही या रस्त्यावरील वाहतुकीच्या पॅटर्नचा सविस्तर अभ्यास केला. त्यामध्ये अपघातांना कारणीभूत ठरणारा अतिवेग (ओव्हरस्पीड) आणि तो नियंत्रित करण्यासाठीच्या उपाययोजनांचा समावेश करण्यात आला.

**ऐंशी टक्के वाहने 'ओव्हरस्पीड'**

वाहनांच्या वेगाच्या अभ्यासासाठी भूमकर चौक ते नवले पूल या दरम्यान 'स्पीड गन' बसविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ऐंशी टक्के वाहने अतिवेगात अर्थात ताशी ६५ किलोमीटरपेक्षा अधिक वेगाने धावत असल्याचे दिसून आले होते. विशेष म्हणजे बहुतांश वाहनांचा वेग ताशी शंभरच्या घरात असल्याचेही दिसून आले.

**उताराचे पाच टप्पे**

कात्रजचा नवीन बोगदा ते नवले पूल या दरम्यान उताराचे पाच टप्पे आहेत. यामध्ये वाहनांना ब्रेक न लावल्यास प्रत्येक टप्प्यावर वेग वाढत जातो. ठरावीक अंतरानंतर उतार संपून रस्ता सपाट असल्याने वाहनचालकालाही वाढत्या वेगाची कल्पना येत नाही, असे काही वाहनचालकांशी बोलल्यानंतर निदर्शनास आले आहे.

**ताशी वेग पन्नासवरून ऐंशीवर**

रस्ता सुरक्षा विभागाने वाहनांच्या वेगाबाबत गेल्या वर्षी अभ्यास केला. त्यामध्ये गीअरमधील वाहन ताशी ५० किलोमीटर वेगाने कात्रजच्या नवीन बोगद्यातून नवले पुलाकडे चालवत आणले. त्या वेळी वाहनाला 'ब्रेक' लावण्यात आला नाही. तीव्र उतारामुळे 'ॲक्सिलेटर' न देताही संबंधित वाहन नवले पुलावर येईपर्यंत त्याचा वेग ताशी ८० किलोमीटरपर्यंत वाढला होता. अशी परिस्थितीत अनेक चालक इंजिन बंद करून, गाडी 'न्युट्रल' करतात. त्या परिस्थितीत वेग आणखी वाढतो आणि ते जीवावर बेतू शकते.

> बोरघाटात 'चेक पॉइंट'ची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे घाटात गाड्यांचा वेग कमी होत होता. त्यानुसार नवले पुलाकडे वेगाने येणाऱ्या वाहनचालकांच्या प्रबोधनासाठी शिंदेवाडी किंवा खेडशिवापूर येथे 'चेक पॉइंट' उभे करणे गरजेचे आहे. त्याचा निश्चितच परिणाम दिसून येईल.
>
> - संजय ससाणे, रस्तेसुरक्षा अभ्यासक

> अतिवेगातील वाहनांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी कात्रजचा नवीन बोगदा ते नवले पुलादरम्यान रम्बलर स्ट्रीप लावण्यात आल्या आहेत. मात्र, वाहनचालकांनी बोगद्यापासूनच वेगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.
>
> - अनिल वळीव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, रस्तेसुरक्षा विभाग

### 'अर्जंट' ब्रेक कारणीभूत?

» 'रम्बलर स्ट्रीप'वरून वेगाने जाणारी वाहने जोरात आदळतात. त्यामुळे पूर्वानुभवातून काही चालक 'स्ट्रीप' येताच वेग अवघ्या एका सेकंदात 'अर्जंट' ब्रेक दाबून कमी करतात. त्या वेळी मागून वेगाने येणारी वाहने पुढील वाहनाला धडकून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. शनिवारी मध्यरात्री झालेला अपघात, अशाच पद्धतीने झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

# कोथरूडमधील सोसायट्यांच्या समस्यांचा आढावा

## » जलदगतीने उपाययोजना करण्याच्या चंद्रकांत पाटलांच्या सूचना

।पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोथरूड परिसरातील सोसायट्यांना भेडसाविणाऱ्या समस्यांबाबबत योग्य ती कार्यवाही करावी आणि पाणीपुरवठा आणि पार्किंगचे प्रश्न सोडविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.**

कोथरूड विधानसभा मतदारसंघातील सोसायट्यांच्या प्रश्नासंदर्भात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आढावा घेतला. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमणार, विकास ढाकणे, शहर वाहतूक पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह सोसायट्यांचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



सिग्मा वन सोसायटी सोसायटीला पुरेशा दाबाने पाणी मिळत नसल्याने अतिरिक्त गरज भागवण्यासाठी विकत टँकर घ्यावे लागत असल्याने सोसायटीला महानगरपालिकेकडून दररोज किमान एक टँकर पाणी देण्याची व्यवस्था करावी, असे पाटील यांनी सांगितले. सोसायटी एका टोकाला असल्याने पाणीपुरवठ्याची समस्या आहे. शहरात सध्या समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असून पुढील पाच महिन्यात या सोसायटीला पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होईल, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख अनिरूद्ध पावसकर यांनी दिली.

### एमआयटीने संस्थेचे विकेंद्रीकरण करावे

» एमआयटी संस्थेने आपले पार्किंगचे काम जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश देऊन पाटील म्हणाले, एमआयटीने संस्थेचे विकेंद्रीकरण करावे. एकाच ठिकाणी विद्यार्थीसंख्या वाढणार नाही. महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखू, सिगारेट आदी पदार्थांची विक्री होऊ नये यासाठी पोलीस विभागाने दैनंदिन गस्त घालावी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. यशश्री कॉलनीतील रहिवाशांच्या मागणीच्या अनुषंगाने ग्रीनझोन कमी करण्याच्या अनुषंगाने विकास आराखड्यामध्ये सुधारणेबाबत प्रस्ताव तयार करावा, अशी सूचनाही पाटील यांनी केली.

# पायाभूत सोयी-सुविधांमुळे डुडूळगाव 'रेसिडेन्सिअल स्पॉट!

## भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचे मत

।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**डुडूळगाव पायाभूत सुविधांनी विकसित झाले आहे. स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, उद्याने यासारख्या अनेक सोयी-सुविधांमुळे शहरात या गावाचा नावलौकीक वाढला आहे, असे मत भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केले..**

### यशदा ग्रुपचे वसंत काटे यांच्यातर्फे 'गेट टुगेदर'



डुडूळगाव येथे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक वसंत काटे यांच्या वतीने यशदा ग्रुप स्प्लेंडीड पार्क येथे "गेट टुगेदर" कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेश लांडगे उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमावेळी माजी महापौर नितीन काळजे, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

समाविष्ट गावांमधील डुडूळगाव येथील आजपर्यंतचा सर्वात मोठा सदनिका प्रकल्प म्हून 'यशदा ग्रुप स्प्लेंडीड पार्क' या गृह प्रकल्पाकडे पाहिले जाते. नागरिकांनी या प्रकल्पाला पसंती दिल्याने या परिसराचा विकास होण्यास सुरुवात झाली आहे. महापालिकेच्या माध्यमातून आमदार महेशदादा लांडगे आणि माजी महापौर नितीन आप्पा काळजे यांनी केलेल्या विकास कामांमुळे या गावाला वेगळी ओळख निर्माण झाली आहे, असे मत व्यक्त करत विकसक वसंत काटे यांनी आमदार महेश लांडगे यांच्या कार्याचे कौतुक केले.



### नवनियुक्त पदाधिका-यांचा सन्मान...

प्रसंगी, प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते खेळ रंगला पैठणीचा या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देवून गौरविण्यात आले. तसेच, सोसायटीतील नवनिर्वाचित अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांचा सन्मान करण्यात आला. रहिवाशांनी आमदार महेश लांडगे आणि माजी महापौरांच्या स्वागताची संधी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

### आमदार लांडगे यांनी समस्या सोडवल्या : सांगळे

शहरातील हजारो गृहप्रकल्पांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण २०१५ मध्ये फेडरेशनची स्थापना केली. फेडरेशनची स्थापना केल्यावर बलाढ्य असे बांधकाम व्यवसासायिक व सर्वसामान्य सदनिकाधारक यांच्यामध्ये अनेकवेळा संघर्ष निर्माण झाले. आशावेळी आमदार महेश लांडगे यांनी सतत सदनिकाधारकांची बाजू घेऊन सोसायट्यांना न्याय दिला. तसेच, सोसायट्यांचा अत्यंत महत्वाचा पाणी प्रश्नाबाबत जातीने लक्ष घालून आंद्रा व भामा धरणांमधून २६८ एमएलडी पाणी मिळवण्यासाठी प्रकल्प हाती घेतले. ओल्या कचऱ्याच्याबाबतही आमदार लांडगे यांनी सोसायट्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेतली. त्यामुळे फेडरेशनच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करतो, असे मत फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी व्यक्त केले.

---

# निगडी येथे महिला शौर्य प्रशिक्षण 'हर घर दुर्गा' अभियान उत्साहात!

## भारतीय संस्कृती मंच, मणिकर्णिका प्रतिष्ठान यमुनानगर निगडी यांच्या वतीने आयोजन

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**भारतीय संस्कृती मंच आणि मणिकर्णिका प्रतिष्ठान यमुनानगर निगडी आयोजित महिला शौर्य प्रशिक्षण 'हर घर दुर्गा अभियान' उत्साहात पार पडले.**





सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या प्राध्यापिका शैलजा सांगळे, प्रा. उत्तम केंदळे (माजी नगरसेवक) व उद्घाटक कमलताई घोलप (माजी नगरसेविका पिंपरी- चिंचवड महानगरपालिका) प्रशिक्षक विजय तेपुगडेसर (सीलंबम आंतरराष्ट्रीय विजेते) विनिता गिरी आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या प्राध्यापिका शैलजाताई सांगळे यांनी महिलांचे स्वसंरक्षण आणि सामाजिक भान यावर व्याख्यान दिले. कमल घोलप यांनी यमुनानगर आणि आपल्या परिसरातील सर्व महिलांना सहभागी होण्याचे आवाहन केले आणि आयोजकांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षक विजय सरांनी लाठी काटी सीलबम याचे प्रात्यक्षिक घेतले व शिबिरार्थींना स्व संरक्षणाचे धडे दिले.

या प्रसंगी नंदकुमार (अप्पा) कुलकर्णी, शरद इनामदार, आदित्य कुलकर्णी, गिरीश देशमुख व मुक्ता गोसावी, शिल्पा नगरकर, शर्मिला ब्रम्हे, मीनल शुक्ल, प्रिया देशमुख, शर्वरी येरगट्टीकर, सुजाता मटकर, अनघा काळे, योगिता शाळीग्राम, अदिती धुळे आदी मान्यवर उपस्थित होते.



## संपादकीय »

### अम्हांस आम्ही पुन्हा पहावे...

***आर्थिक आघाडीवर नजीकच्या काळात भारत लक्षणीय प्रगती करेल, अशी चिन्हे आहेत. मनावर दडपण नसणारी आणि तंत्रज्ञानाच्या लाटेवर आरूढ झालेली आजची तरुणाई हे नव्या भारताचे आशास्थान आणि बलस्थान आहे! लोकसंख्यावाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची, आव्हानांची चर्चा करताना सकारात्मक बाबींकडे डोळेझाक होऊ नये.***

भारत सर्वाधिक लोकसंख्येचा देश झाल्याची बातमी आल्यानंतर उमटलेल्या बहुतांश प्रतिक्रियांचा सूर नकारात्मक दिसून आला. त्यामुळे या विषयाकडे नव्याने बघण्याची आवश्यकता आहे, हे जाणवले. शहरांमधील वाढती लोकवस्ती, पायाभूत सुविधांचे प्रश्न, वाहतूक कोंडीच्या वाढत्या समस्या, पाणीपुरवठा, वीज यांच्या पुढील काळात वाढणाऱ्या गरजा कशा पूर्ण होणार, या शंका रास्त आहेत. वाढत्या शहरीकरणाकडे पाहताना कायदा-सुव्यवस्था, नागरी सेवा यांमध्ये प्रशासनापुढे असणारी आव्हानेही समोर येतात. पण या विषयाच्या दुसऱ्या आणि सकारात्मक बाजूकडेही मोकळ्या मनाने बघणे जरुरीचे आहे.

लोकसंख्येच्या बातमीइतकीच महत्त्वाची बातमी म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या निकषावर ब्रिटनला मागे टाकून भारताने जगातील पाचव्या क्रमांकाचा मान पटकावला. भारताच्या आर्थिक वाढीचा दर १९८०च्या दशकात चार टक्क्यांच्या घरात होता. त्याची "हिंदू रेट ऑफ ग्रोथ" म्हणून पाश्चात्त्य देश अवहेलना करीत. या सुमारास चीनने आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला. साम्यवादी धोरणे आमूलाग्र बदलून परकी गुंतवणूक आणि निर्यातीची कास धरली. 'आशियाई वाघ'ही तडफेने प्रगती करताना दिसले. भारत मात्र या स्पर्धेत भारत उशिरा उतरला; पण तरीही १९९० च्या दशकात ५.५%, तर २०००-२०१० च्या दशकात ७% वाढीचा दर भारताने गाठला.

गेल्या १२ वर्षांत परकी चलनाची समस्या, थकित- बुडित कर्जांचा प्रश्न आणि कोविड-१९चे महासंकट यांचा सामना करून आर्थिक वाढीचा दर ६.५% पर्यंत राखण्यात भारताने यश मिळविले. जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असणारा जर्मनी व तिसऱ्या क्रमांकावर असलेला जपान यांचा गेल्या दशकातील वाढीचा दर नगण्य आहे. मंदीचे सावट असताना जर्मनी व जपानची आर्थिक वाढ सुधारण्याची अपेक्षा नाही.

# वाढत्या इंधनदरांची चिंता कोणाला?




**युक्रेन युद्धानंतर रशियाशी व्यापार करण्यावर जागतिक पातळीवर विविध निर्बंध घालण्यात आले आहेत. यामध्ये, रशियाला तेल व्यापारातून कमीतकमी उत्पन्न मिळावे म्हणून रशियन तेलाचा भाव ६० डॉलर्स प्रति पिंप यापेक्षा जास्त असून नये असाही एक निर्बंध आहे (दरम्यान जागतिक दर ८०-११० डॉलर्स प्रति पिंप असा होता)! तो एकप्रकारे भारताच्या पथ्यावर पडला आहे. निर्बंध असले तरीही भारत सध्या मोठ्या प्रमाणात रशियन तेल विकत आहे;**

भारत सध्या सर्वात जास्त तेल रशियाकडून घेत आहे (इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात हे अनुक्रमे इतर निर्यातदार आहेत).

रशियन तेलाचा दर किती?

रशियासुद्धा ओपेकप्लसचा सभासद आहे, हे खरे. परंतु या रशियन तेलाचा भाव भारत व रशिया यांनी परस्पर वाटाघाटीतून ठरविला आहे. तो प्रत्यक्षात किती आहे याविषयी उलटसुलट आकडे प्रसिद्ध होत असतात. गेल्या एक-दीड वर्षात, एकूण भारतीय तेल आयातीतील रशियन तेलाचा हिस्सा १ टक्क्यावरून ३५ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे वरील दरवाढीचा परिणाम थोडा तरी कमी होईल. या व्यवहारासाठी अमेरिकन डॉलर्सचा वापर करता येतच नसल्याने, या तेलाची देय रक्कम भारतीय रुपयांतही न देता, भारत ती संयुक्त अरब अमिरातीच्या दिहराममध्ये देत आहे (काही वर्षांपूर्वी संयुक्त अरब अमिरातीची एक राजकन्या आपल्या वडिलांच्या जाचाला कंटाळून पळून गेली असताना, तिचे जहाज गोव्याजवळ भारतीय यंत्रणांनी पकडून संयुक्त अरब अमिरातीकडे परत सोपविले होते व त्यामुळे संयुक्त अरब अमिरातीचे अमीर भारतावर विशेष मेहेरबान आहेत असा एक समाज आहे; सत्यता सिद्ध झालेली नाही).

मुख्य म्हणजे, रशियन तेलाचा भाव खुल्या बाजारपेठेतील भावापेक्षा कमी असल्याने भारताचा फायदा होतो. हा फायदा



दुहेरी आहे- एकीकडे अंतर्गत वापरात कमी भावामुळे बचत होते. त्याचबरोबर, हे स्वस्त भावात घेतलेले तेल शुद्ध (रिफाइन) करून भारतीय कंपन्या पेट्रोल, डिझेल व इतर रसायने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जो दर प्रचलित आहे तो लावून युरोप व अमेरिकेत विकतात व त्यातून बराच फायदा कमावतात. यात सुमारे ६० टक्के कंपन्या खासगी असून, बाकी सार्वजनिक आहेत.

भारताचा फायदा दुहेरी!

भारत सरकारला तर दुहेरी फायदा होत आहे. जरी मुळात स्वस्तात तेल विकत घेतले तरी, किरकोळ ग्राहकाला सरकार कमी भाव देत नाही. तसेच, या पुनर्विक्री व्यापारातून सरकारला बराच कर मिळत आहे. जागतिक स्तरावर, करोनामुळे बहुतेक देशांवर आर्थिक अडचण आली. त्यात युक्रेनला हे देश मदत करीत आहेत. त्याचप्रमाणे इंधन तेलाचे दर या युद्धानंतर बरेच वर गेले, रशियाने सूड म्हणूनही यापैकी काही देशाना तेल देणे बंद केले. जरी वरील भारतीय कंपन्यांच्या व्यापाराचे एकूण प्रमाण वरील खरेदीदार देशांमध्ये फार मोठे नसले, तरी हा इंधन खरेदीचा एक नवीन मार्ग उपलब्ध होणे या देशांसाठी महत्वाचे आहे. या देशांनी भारताचा अनुनय करण्याचे हेही एक कारण आहे.तसेच, भारताने हे तेल न घेतल्यास चीन ते विकत घेईल, हे अनेक पाश्चिमात्य देशांना नको आहे. शिवाय, तेल व्यापारामुळे भारत व रशिया यांच्यात संवादाचा एक मार्ग जिवंत राहतो व त्यामुळे भारताचा थोडा तरी प्रभाव रशियावर पडू शकतो. अन्यथा, चीन ही पोकळी भरून काढेल ही देखील काळजी आहे.दुसऱ्या बाजूने पाहिल्यास, युक्रेनने आधी म्हटल्याप्रमाणे, या व्यवहारातून भारताने कमाविलेला पैसा हा युक्रेनच्या जनतेच्या रक्ताने माखलेला आहे.

**लोकसंख्येच्या सध्याच्या अनुमानानुसार भारतानं चीनला मागं टाकल्यामुळे लोकसंख्येच्या मुद्दयाला भारतात आणि चीनमध्ये सुद्धा अचानक महत्त्व प्राप्त झाले आहे.**



# मनुष्यबळ कुशल हवं !

भारत चीनला मागे टाकून पुढे जाणार हे तर सत्यच होते. साधारणपणे हे २०२८ च्या सुमारास होईल असे अनुमान होते, परंतु दोन्ही देशातील जन्म-मृत्यूच्या प्रमाणात जे काही बदल नोंदवले जात होते त्यानुसार ती वेळ बदलत होती. अगदी आत्ताआत्तापर्यंत २०२३ च्या मध्याला भारत चीनच्या पुढे जाईल असे वाटत असतानाच एप्रिलमध्येच ते घडले.

चीनबद्दल बोलायचे झाले तर चीनने आपली वाढत असलेली लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी खूप कडक धोरणाचा अवलंब केला आणि त्यांच्या राज्यपद्धतीत त्यांना ते शक्यही झाले. १९८० पासून २०१५ पर्यंत फक्त 'एक मूल" योजना कार्यान्वित होती. दुसरे मूल होण्यासाठी अतिशय सयुक्तिक कारण असणे गरजेचे होते; किंवा मग काही प्रमाणात मोठा दंड भरण्याची आणि काही वेळा शिक्षा भोगण्याची तयारी असेल तरच दुसरे मूल असणे शक्य होते. सामाजिक परिस्थितीही अशी होती की दुसरे मूल असणे म्हणजे "काहीतरी वेगळंच" असणे होते. अशा कडक योजनेनंतर लोकसंख्या नियंत्रण क्रमप्राप्तच होते.

भारताची स्थिती त्यामानाने खूपच वेगळी होती. स्वातंत्र्यानंतर अगदी पहिल्याच म्हणजे १९५१ च्या जनगणनेतून लोकसंख्यावाढीचा दर जास्त असल्याचे जाणवले आणि त्यावरचा उपाय म्हणून अगदी लगेच म्हणजे १९५२ मध्येच भारताने कुटुंबनियोजनाचा राष्ट्रीय पातळीवर स्वीकार केला. भारतापुढे इतर कोणत्याच देशाचे उदाहरण नव्हते आणि काही अनुभवही नव्हता, त्यामुळे हळूहळू , थोडे टक्केटोणपे खात कार्यक्रम सुरू झाला. कुटुंबनियोजन पद्धती वापरण्याचा विचार मुळात नवीन असल्याने तो रुजायला वेळ लागत होता. होणारी - होऊ शकणारी मुले थांबवणे म्हणजेच नाकारणे, भारतीय मानसिकतेला मानवत नव्हते. याखेरीज उपलब्ध पद्धतीची परिणामकारकता पुरेशी नव्हती. साधने मिळणे तितकेसे सोपे नव्हते आणि हे सगळे समजून घेऊन पद्धतीचा किंवा साधनांचा सातत्याने वापर करण्याइतकी भारतीय जनता शिक्षित नव्हती, जागरूक नव्हती. जगभरात लोकसंख्यावाढीची चर्चा सुरू झाली होती आणि त्यातूनच "विकास हेच सर्वांत महत्त्वाचे गर्भनिरोधक' आहे असा विचार पुढे येत होता. विकसित देशांनी हे जगाला दाखवून दिले होते. त्या देशांमध्ये जन्मदर आणि मृत्युदर दोन्हीही एकत्रितपणे आणि सावकाश खाली आल्यामुळे विकसनशील देशांना भेडसावणारी लोकसंख्यावाढीची समस्या त्यांना तितकीशी जाणवली नव्हती. विकसनशील देशात जन्मदर आणि झपाट्याने खाली येणारा मृत्यूदर यामुळे लोकसंख्यावाढीचा वेग अतोनात होता.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्र्यांचा कामांमध्ये पॉज!

## हेलिकॉप्टर घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अचानक सुट्टीवर

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील सत्तांतराच्या चर्चा, त्यात अजित पवारांच्या बंडाच्या चर्चा, अशा ताज्या घटना असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेलिकॉप्टर घेऊन अचानक तीन दिवसांच्या सुट्टीवर गेल्याची माहिती समोर आलीये. त्यामुळे तर्कवितर्कांना उधाण आलं असून मुख्यमंत्री नाराज असल्याने गावाकडे निघून गेल्याची चर्चा रंगलीय. राज्यात विविध घडामोडी सुरु असताना मुख्यमंत्र्यांनी सुट्टीवर जाणं हे पहिल्यांदाच घडतंय. सीएम वर्किंग डे'लाच सुट्टीवर कशासाठी गेले? त्यामागचा नेमका अर्थ आणि कारणं काय?, याविषयी राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**



राज्यात अनेक गंभीर प्रश्न प्रलंबित असताना मुख्यमंत्री शिंदे २४ ते २६ एप्रिल दरम्यान तीन दिवस सुट्टी घेऊन कुटुंबासह साताऱ्यात त्यांच्या दरे या गावी गेल्याची माहिती आहे. गावाच्या जत्रेसाठी हा पूर्वनियोजीत दौरा असल्याचा दावा त्यांच्या कार्यालयाने केलाय. पण गावी जाण्यामागे इतरही काही कारणं असल्याचं बोललं जातंय. यातलं पहिलं कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाची शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेवर निकाल. या निकालावर अनेक गोष्टी अवलंबून आहेत. जर हा निकाल शिंदेंच्या बाजूने लागला तर राज्यात असलेले सरकार कायम असेल. जर निकाल त्यांच्या विरोधात लागला तर शिंदे गटासाठी तो मोठा धक्का ठरेल. निकाल आपल्याच बाजूने लागावा यासाठी शिंदे देवाला साकडं घालण्यासाठी गेल्याच्या चर्चा आहे.

तर दुसरं कारण म्हणजे राज्यातील सरकार कायम राहावं यासाठी भाजप प्लॅन बी करत आहे. त्यामध्ये अजित पवारांना सोबत घेऊन सरकार स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याच्या चर्चा आहे. भाजपने अजित पवारांना सोबत घेण्याची चर्चा कदाचित शिंदे यांना पटली नसावी. त्यामुळे ते काही दिवस सुट्टीवर गेल्याचा अंदाज अनेकांनी वर्तविला आहे.

तिसरं कारण म्हणजे खारघर दुर्घटनेत १४ श्रीसेवकांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. शक्तीप्रदर्शनाच्या प्रयत्नात श्रीसेवकांचा मृत्यू झाल्याच्या आरोप विरोधकांनी केला. प्रकरण हायकोर्टात गेल्यानेही मुख्यमंत्री चिंतेत असल्याचे सांगितले जाते. एकीकडे राज्यात उलट सुलट चर्चा सुरु असताना भाजपचे राज्यातील वरिष्ठ नेते कर्नाटकात आहेत. तेथील निवडणुकीच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन, आशिष शेलार, प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड हे कर्नाटकमध्ये गेले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांवर दबाव वाढत चालला होता. याच दबावातून देखील ते रजेवर असल्याची चर्चा होत असून विविध तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.**एकनाथ शिंदे खरंच नाराज होऊन गावाला निघून गेले का?**

### मुख्यमंत्री बदलण्याच्या चर्चेमुळे शिंदे नाराज

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपला अपेक्षित अशी कामगिरी करता न आल्याने दिल्लीत पडद्यामागे मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली सुरु आहेत, असे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केले होते. राऊतांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. ही सगळी चर्चा सुरु असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज होऊन साताऱ्याला त्यांच्या गावी निघून गेल्याची आणखी एक वदंता राजकीय वर्तुळात पसरली आहे. भाजपकडून पडद्यामागून अजित पवार यांच्याशी सुरु असलेल्या वाटाघाटी आणि मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली या बातम्यांमुळे एकनाथ शिंदे हे नाराज झाल्याचे सांगितले जाते. त्यामुळे त्यांनी तडकाफडकी तीन दिवसांसाठी साताऱ्याला जाण्याचा निर्णय घेतला, अशी कुजबूज सुरु आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्पष्टीकरण देत हा दावा फेटाळून लावला आहे.

### एकनाथ शिंदे यांच्या गावची जत्रा

**उदय सामंत हे मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज होऊन गावाला निघून गेले आहेत का, असे विचारण्यात आले. त्यावर उदय सामंत यांनी म्हटले की, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गावची जत्रा आहे. ते गावच्या जत्रेला गेले आहेत. गावच्या जत्रेला गेल्यावरही मुख्यमंत्री नाराज आहे असं कुणी म्हणत असेल, तर त्यांचा नागरी सत्कार त्यांच्याच जत्रेत केला पाहिजे", असे उदय सामंत यांनी म्हटले.**

संजय राऊत यांनी महाराष्ट्रातील मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली सुरु असल्याचा दावा केला होता. भाजपला मविआचे सरकार पाडायचे होते. त्यासाठी एकनाथ शिंदेंचा वापर झाला, ते काम पूर्ण झाले आहे. पण राजकीयदृष्ट्या भाजपला महाराष्ट्रात ताकद देण्यात हे मुख्यमंत्री अपयशी ठरले आहेत. त्यामुळे आता दिल्लीत मुख्यमंत्री बदलण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत, असा दावा संजय राऊत यांनी केला होता.

# महाराष्ट्र पोलिस दलात मोठे फेरबदल!

## सिंग, दाते आता महासंचालक; 30 IPS अधिकाऱ्यांच्याही बदल्या

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील ३० आयपीएस अधिकाऱ्यांची बढती आणि बदल्यांचे आदेश सोमवारी सायंकाळी जारी करण्यात आले. पोलिस उपनिरीक्षक श्रेणीतील पदावरील अनेक अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.**

राज्यातील राजकीय वातावरण तापलेले असताना पोलिस दलामध्ये अनेक मोठे फेरबदल करण्याचा निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने सोमवारी घेतला.

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे (एटीएस) प्रमुख सदानंद दाते आणि ठाण्याचे पोलिस आयुक्त जयजीत सिंह यांना महासंचालकपदी बढती देण्यात आली असून दोघांनाही त्यांच्या पदांवर कायम ठेवण्यात आले आहे. बिपीन कुमार सिंह यांना पदोन्नती देत त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही





दिवसांपासून चर्चेत असणारे छत्रपती संभाजी नगरचे पोलिस आयुक्त निखील गुप्ता यांच्या जागी पिंपरी चिंचवडचे पोलिस सहआयुक्त मनोज लोहिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुप्ता यांना नियुक्तीच्या प्रतीक्षेत ठेवण्यात आले आहे.

पोलिस उपायुक्त अभिनव देशमुख यांना मुंबईच्या दक्षिण प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त पोलिस आयुक्त पद देण्यात आले आहे. अनिल पारसकर यांना मध्य विभागाचे अतिरिक्त पोलिस आयुक्त म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे.

मुंबईच्या वाहतूक विभागाच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तपदी एम.रामकुमार यांना पदोन्नती देण्यात आली आहे. नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले विरेंद्र मिश्रा यांच्याकडे विशेष शाखेच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तपदाची; तर दीपक साकोरे यांच्याकडे नवी मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. पंजाबराव उगले यांची बदली ठाण्यातील गुन्हे शाखेच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तपदी करण्यात आली आहे.

### 12 विशेष पोलिस महानिरिक्षकांना पदोन्नती

**गृह विभागाने जाहीर केलेल्या शासन आदेशानुसार राज्यातील १२ विशेष पोलिस महानिरीक्षकांना आणि दोन विशेष पोलिस महानिरीक्षकांची बदली करण्यात आली आहे. पदोन्नतीमध्ये संजय दराडे यांना पुणे विभागाच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष पोलिस महानिरीक्षक पदी, अनिल कुंभारे यांची राज्याच्या दहशतवादी विरोधी पथकाच्या विशेष पोलिस महानिरीक्षक पदी, संजय शिंदे यांची पिंपरी चिंचवडच्या सह आयुक्त पदाचा समावेश आहे. के.एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांची बदली राज्याच्या पोलिस महासंचालक विभागात विशेष पोलिस महानिरीक्षक (आस्थापना) तर मनोज लोहिया यांची छत्रपती संभाजी नगरच्या पोलिस सहआयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.**

# कर्नाटकात प्रचार वेगात!

## योगींच्या आज तीन जाहीरसभा, मोदींच्या प्रचारसभा शुक्रवारपासून

।नवी दिल्ली महाईन्यूज।

**कर्नाटकमधील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींची पहिली प्रचारसभा २८ एप्रिल रोजी होणार आहे. त्यानंतर ७ मे पर्यंत मोदींचे झंझावाती दौरे राज्यभर आयोजित करण्यात आल्याचे भाजपच्या सूत्रांचे म्हणणे आहे.भाजपचे पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे दोन्ही दिग्गज नेते सध्या कर्नाटकमध्ये जाहीरसभा तसेच, रोड शो घेत आहेत. पण, भाजपसाठी मोदी हेच निवडणुकीचा चेहरा असल्याने त्यांच्या सहभागानंतर भाजपच्या प्रचाराला खऱ्या अर्थाने गती मिळेल. मोदी सहा दिवसांमध्ये १२ ते १५ जाहीरसभा व रोड शो घेणार आहेत. मोदी २८ व २९ एप्रिल, ३ व ४ मे तसेच, ६ व ७ मे अशी तीन टप्प्यांमध्ये प्रचार करतील.**



गेल्या आठवड्यामध्ये भाजपने ४० नेत्यांचा समावेश असलेल्या तारांकित प्रचारकांची यादी जाहीर केली होती. त्यामध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचाही समावेश असून योगी बुधवारपासून कर्नाटकमध्ये निवडणूक प्रचार सुरू करतील. योगींच्या बुधवारी तीन जाहीरसभा आयोजित करण्यात आल्या आहेत. २०१७ नंतर झालेल्या प्रत्येक निवडणुकीमध्ये योगी आदित्यनाथ यांचा आक्रमक प्रचार आकर्षण ठरले होते. यावेळी कर्नाटकमध्ये हिजाब, हलाल यासारख्या वादग्रस्त विषयांवर अधिक भर न देण्याचे भाजपने ठरवले असल्याने योगींच्या भाषणातील मुद्द्यांची उत्सुकता असेल. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह करोनामुक्त झाले असून तेही बुधवारी कर्नाटक दौऱ्यावर असतील. कर्नाटकमध्ये १० मे रोजी मतदान होणार असून १३ मे रोजी मतमोजणी होईल. भाजपसाठी कर्नाटक राज्य दक्षिण भारताचे प्रवेशद्वार असून इथे सत्ता राखण्याचे मोठे आव्हान पक्षासमोर आहे.

# कर्नाटकात शेवटच्या क्षणी भाजपचीच सत्ता येणार

।बागलकोट। महाईन्यूज।



कर्नाटकातलं राजकीय वातावरण चांगलंच तापलंय. 10 मे रोजी विधानसभा निवडणूक होणार आहेत, तर 13 मे रोजी निकाल लागणार आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी मोठं वक्तव्य केलंय.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज (मंगळवार) कर्नाटकातील यादगीर शहरात पोहोचले आहेत. इथं त्यांनी रोड शो केला. दरम्यान, त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना राज्यात दुहेरी इंजिनचं सरकार स्थापन होणार असल्याचा दावा केला. यावेळी काँग्रेसवरही जोरदार निशाणा साधला.

शहा म्हणाले, प्रत्येक वेळी निवडणुकीपूर्वी काँग्रेस जिंकत असल्याची चर्चा होते, पण शेवटी भाजपचाच विजय होतो. शहा यांना राज्यातील परिस्थितीबद्दल विचारले असता ते म्हणाले,'राज्यात निश्चितच पूर्ण बहुमत असलेलं भाजपचं सरकार म्हणजेच, दुहेरी इंजिन सरकार स्थापन होणार आहे.'

आरक्षणावर शहा म्हणाले, मुस्लिम आरक्षणाच्या नावाखाली मागास, दलित, आदिवासी, लिंगायत आणि वोक्कलिगांचे हक्क हिरावले गेले आहेत. त्यामुळं त्यांनी राज्यातील असंवैधानिक मुस्लिम आरक्षण रद्द केल्याचं सांगितलं. निवडणुकीपूर्वी आरक्षणात केलेल्या बदलांचा पक्ष आणि सर्वसामान्यांना फायदा होईल का? या प्रश्नावर शहा यांनी नक्कीच मिळेल, असं उत्तर दिलं.

# ज्येष्ठ नेते प्रकाशसिंग बादल यांचे निधन

।चंदिगड। महाईन्यूज।



शिरोमणी अकाली दलाचे ज्येष्ठ नेते आणि पंजाबचे माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांचे श्वसनविकाराने मंगळवारी निधन झाले. ते 95 वर्षांचे होते. मोहालीतील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांचा मुलगा आणि पक्षाध्यक्ष सुखबीरसिंग बादल यांच्या पीए यांनी ही माहिती दिली.

प्रकाशसिंग बादल यांचा जन्म 8 डिसेंबर 1927 रोजी पंजाबच्या मलोतजवळील अबुल खुराना गावात झाला होता. 1947मध्ये त्यांनी राजकारणात पदार्पण केले. 1957मध्ये पहिली विधानसभा निवडणूक लढवली. 1969मध्ये त्यांनी पुन्हा विजय मिळवला. 1969-70मध्ये ते पंचायत राज, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय इत्यादी खात्यांचे मंत्री होते. त्यांनी पाच वेळा पंजाबचे मुख्यमंत्रीपद भूषविले होते. 1970 ते 1971 आणि पुन्हा 1977 ते 1980 या कालावधीत ते राज्याचे मुख्यमंत्री होते. यानंतर ते 1997 ते 2002 आणि 2007 ते 2017 यादरम्यान ते पुन्हा पंजाब राज्याचे मुख्यमंत्री होते. याशिवाय 1972, 1980 आणि 2002मध्ये ते विरोधी पक्षनेतेही होते. एवढेच नाही तर, मोरारजी देसाई पंतप्रधान असताना त्यांनी केंद्रीय कृषिमंत्री म्हणूनही काम पाहिले होते. प्रकाशसिंग बादल यांना 30 मार्च 2015 रोजी पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

बादल यांना गेल्या वर्षी जानेवारीमध्ये कोरोनाची लागण झाली होती आणि त्यांना लुधियाना येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता आठवडाभरापूर्वी श्वसनाला त्रास होत असल्याने त्यांना मोहाली येथील फोर्टिस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंहयांनी बादल यांच्या प्रकृतीची चौकशी केली होती आणि त्यांच्या उत्तम स्वास्थ्याबद्दल प्रार्थना केली होती. पण उपचार सुरू असतानाच त्यांनी मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास अखेरचा श्वास घेतला.

# कर्नाटक सरकारचा विजेसाठी उत्तर प्रदेश, राजस्थानशी करार

## दोन्ही राज्यांमध्ये आर्थिक करार नसून तो एक ‘विनिमय करार’

।बंगळुरू।
महाईन्यूज।प्रतिनिधी।

**बंगळूर - उन्हाळा सुरू झाला असून कर्नाटकात विजेची मागणी वाढली आहे. या संदर्भात राज्य सरकारने राजस्थान आणि उत्तर प्रदेश राज्यांशी ‘विनिमय करार’ केला आहे. विशेष म्हणजे दोन्ही राज्यांमध्ये कोणताही आर्थिक करार नसून तो एक ‘विनिमय करार’ आहे.**



‘विनिमय करारा’अंतर्गत राजस्थान आणि उत्तर प्रदेशमधून एप्रिल आणि मे दरम्यान वीज घेतली जाणार आहे. कर्नाटकातून जून आणि जुलैमध्ये त्या राज्यांना वीज परत दिली जाईल. या काळात मॉन्सून सुरू झाल्यामुळे राज्याची विजेची गरज कमी असेल. मात्र, त्यावेळी उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये विजेची मागणी जास्त असेल, असे राज्याच्या ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

### विजेची मागणी वाढणार

कर्नाटकात ३२ दशलक्ष युनिट्सची क्षमता आहे, जी कोणत्याही क्षणी नऊ हजार मेगावॉटपर्यंतची सर्वोच्च वीज मागणी हाताळू शकते. मॉन्सूनपूर्व पावसाला होणारा विलंब आणि वाढलेले तापमान यामुळे येत्या काही दिवसांत विजेची मागणी आणखी वाढण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी दिली आहे.

राज्याला दररोज उत्तर प्रदेशातून १० दशलक्ष युनिट्स आणि राजस्थानमधून २०० मेगावॅट वीज मिळत आहे.



बंगळूरमध्ये दैनंदिन विजेचा वापर आणि मागणी वाढली आहे. २० एप्रिल रोजी संपूर्ण राज्यात ३०९.५ दशलक्ष युनिट्स आणि बंगळूर इलेक्ट्रिसिटी सप्लाय कॉर्पोरेशन (बेस्कॉम) व्याप्तीत १४६ दशलक्ष युनिट्स वीज वापरली.

ऊर्जा विभागाच्या नोंदीनुसार सकाळी ९-३० ते ११-३० या वेळेत विजेची मागणी जास्त असते. मागील वर्षांच्या तुलनेत यावेळी दिवसभरात कृषी क्षेत्रातून विजेची मागणी १८ ते २० टक्क्यांनी वाढली आहे. देशांतर्गत शेतीसाठी ४-५ टक्के मागणी वाढली आहे, तर औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रातून मागणी वाढलेली नाही.

## शाहरुख खान काश्मीरमध्ये झाला स्पॉट

लाइम लाइटमध्ये राहण्यासाठी शाहरुख खानला कोणत्याही खास कारणाची गरज नाही. आधी पठाण मग आयपीएल आणि आता काश्मीर. होय, नुकताच किंग खान काश्मीरमध्ये स्पॉट झाला आहे. त्याचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अभिनेता त्याच्या पुढच्या चित्रपटाच्या तयारीसाठी तिथे पोहोचल्याचे बोलले जात आहे.



शाहरुख खानचा हा व्हिडिओ अनेक प्लॅटफॉर्मवर व्हायरल होत आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर, अभिनेता त्याच्या आगामी चित्रपट डंकीच्या शूटिंगच्या संदर्भात काश्मीरला पोहोचला आहे. लीक झालेल्या व्हिडिओमध्ये शाहरुखचे ग्रँड वेलकम त केले जात आहे. त्याचवेळी पठाणच्या जबरदस्त यशानंतर डंकीबाबत लोकांमध्ये खळबळ उडाली आहे.

व्हायरल होत असलेल्या क्लिपनुसार शाहरुख सध्या काश्मीरमध्ये आहे. रिपोर्ट्सनुसार, किंग खान काश्मीरमधील सोनमर्गमध्ये डंकीच्या एका गाण्याच्या सीक्वन्स शूट करण्यासाठी पोहोचला आहे. क्लिपमध्ये, SRK हातात पुष्पगुच्छ घेऊन काळ्या जॅकेटमध्ये हॉटेलमध्ये जाताना दिसत आहे. याआधी शाहरुख 2012 साली प्रदर्शित झालेल्या यश चोप्राच्या जब तक है जानच्या शूटिंगसाठी काश्मीरमध्ये आला होता.

शाहरुख खान, दीपिका पदुकोण आणि जॉन अब्राहम स्टारर पठाणने बॉक्स ऑफिसवर इतिहास रचला आहे.

## 'लता मंगेशकर स्मृती पुरस्कार' आशा भोसलेंना प्रदान





मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानातर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा काहीच दिवसांपूर्वी झाली. यामध्ये ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना लता मंगेशकर स्मृती पुरस्कार तसेच इतर पुरस्कारांमध्ये बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालन आणि मराठमोळा अभिनेता प्रसाद ओक या कलाकारांचीही समावेश होता. 24 एप्रिल रोजी हा पुरस्कार सोहळा मुंबईत पार पडला आहे. आशा भोसलेंना हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते दीनानाथ मंगेशकर पुरस्कार देण्यात आला. भाऊ हृदयनाथ यांच्या हस्ते दीनानाथ मंगेशकर पुरस्कार मिळाल्याने आशा भोसले प्रचंड आनंदी होत्या.

गेल्यावर्षीपासून मंगेशकर कुटुंबीयांकडून देण्यात येणाऱ्या 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कारा'च्या यंदाच्या मानकरी आशा भोसले ठरल्या.यंदाचं या पुरस्कारांचं ८१ वं वर्ष आहे. या विविध पुरस्कारांचे मानकरी पुढील प्रमाणे आहेत....

आशा भोसले - लता मंगेशकर स्मृती पुरस्कार, पंकज उदास - संगीत पुरस्कार

प्रशांत दामले - नाटक, प्रसाद ओक - सिनेमा

विद्या बालन - सिनेमा, श्री सदगुरू सेवा संघ - समाजसेवा, ग्रंथाली प्रकाशन - साहित्य

## नील शेट्टीचा मुलगा अहान गर्लफ्रेंडसोबत झाला रोमँटिक

अथिया शेट्टीचा भाऊ अहान शेट्टी क्वचितच लाइम लाइटमध्ये राहतो. पण, आता त्याचे लेटेस्ट फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. अहान त्याची लाँग टाइम गर्लफ्रेंड तानिया श्रॉफसोबत स्पॉट झाला होता. आम्ही तुम्हाला सांगतो की, दोघे नुकतेच मॉडेल सोफिया रिची आणि इलियट ग्रेंज यांच्या लग्नाच्या पार्टीत सहभागी झाले होते.

तानिया श्रॉफने तिच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर लग्नाच्या पार्टीचे फोटो शेअर केले आहेत. ज्यामध्ये वधू-वरांसोबत ती अहानसोबत पोज देताना दिसत आहे. दोघांची जोडी खूप पसंत केली जात आहे. अहानची बहीण आणि सुनील शेट्टीची मुलगी अथिया शेट्टीनेही या फोटोंवर कमेंट बॉक्समध्ये प्रेमाचा वर्षाव केला आहे.

अहान शेट्टी आणि तानिया श्रॉफचे व्हायरल झालेले फोटो तुम्ही पाहू शकता. या फोटोंमध्ये दोघेही एकमेकांसोबत खूप रोमँटिक अंदाजात दिसत आहेत. एका फोटोमध्ये अहानने त्याच्या लेडी लव्हला तिच्या गालावर किस केले आहे. या लव्ह बर्ड्सच्या फोटोंवर अथिया व्यतिरिक्त सर्व स्टार्सनी आपल्या प्रेमाचा वर्षाव केला आहे.

सोशल मीडियावर या जोडप्याने त्यांच्या नात्याचा खुलासा करण्याची ही पहिलीच वेळ नाही.



याआधीही तानियाने अहानसोबतचे अनेक खास क्षण तिच्या हँडलवर शेअर केले आहेत. काही लोकांना वाटते की तानिया ही जॅकी श्रॉफची मुलगी आहे. मात्र, हे सत्य नाही. तानिया फॅशन डिझायनर आहे. अहान आणि तानिया लहानपणापासून एकमेकांना ओळखतात. 2015 मध्ये दोघांनी त्यांच्या नात्याला अधिकृत टॅग दिला होता.

## 'तुम्ही वेडे झाले आहात...'

परिणीती चोप्राच्या लग्नाच्या बातम्या सध्या खूप चर्चेत आहेत. आम आदमी पार्टीचे नेते राघव चड्ढासोबत तिच्या डेटींगच्या अफवा अलीकडच्या काळात पसरल्या होत्या. रिपोर्ट्सनुसार, नुकतेच दोघांनी एका क्लोज सेरेमनी दरम्यान एंगेजमेंट केले. अद्याप याबद्दल कोणतीही पुष्टी केलेली माहिती नाही, परंतु याबद्दल जोरदार चर्चा केली जात आहे. आता पुन्हा एकदा विमानतळावर पाहिल्यावर पापाराझींनी परिणीतीला काही प्रश्न विचारले, ज्याचे तिने एका ओळीत उत्तर दिले.

आजकाल परिणीती अनेकदा एअरपोर्टवर दिसते. काल सोमवारीही परिणीती एअरपोर्टवर दिसली आणि पापाराझींनी तिला राघव चड्ढासोबतच्या लग्नाबद्दल विचारपूस सुरू केली. पापाराझींनी तिला विचारले की ती राघव चड्ढासोबत कधी लग्न करणार आहे.

लग्नाबाबत सांगा कारण आम्हाला पण कुर्ते शिवून घ्यायचे आहे, असे ते म्हणताना दिसत आहेत. पापाराझींनी अभिनेत्रीला सांगितले की ते मुलीच्या बाजूने असतील. हे सर्व ऐकून परिणीती हसू लागली आणि ती म्हणाली - तुम्ही लोक वेडे झाले आहात. यानंतर परिणीतीने पापाराझींना काही पोजही दिल्या.

खरं तर, अलीकडेच परिणीतीच्या रिंग फिंगरमध्ये एक सिल्व्हर कलरचा बँड दिसला होता. मीडिया रिपोर्ट्सनुसार, परिणीती आणि राघवचा एंगेजमेंट सोहळा नुकताच पार पडला आणि यावेळी फक्त कुटुंबातील सदस्य उपस्थित होते असे वृत्त आहे. ऑक्टोबरमध्ये दोघे लग्न करणार असल्याचेही बोलले जात आहे.



# राशिद-नूरच्या फिरकीचा भेदक मारा

## गुजरातने केला मुंबई इंडियन्सचा दारूण पराभव

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६ व्या हंगामातील ३५ वा सामना आज सायंकाळी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात झाला. मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यानंतर गुजरात टायटन्सच्या खेळाडूंनी धडाकेबाज फलंदाजी करून २० षटकांत ६ विकेट्स गमावत २०७ धावांपर्यंत मजल मारली. मात्र, या धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची मात्र पुरती दमछाक झाली. राशिद खान आणि नूर अहमदच्या अप्रतिम गोलंदाजीमुळं मुंबई इंडियन्सची दाणादाण उडाली. त्यामुळे मुंबई इंडियन्सने २० षटकात ९ विकेट्स गमावत १५२ धावा केल्या. त्यामुळे गुजरात टायन्सचा या सामन्यात ५५ धावांनी विजय झाला.**

मुंबईसाठी रोहित शर्माने (२), ईशान किशन (१३), कॅमरून ग्रीन (३३), तिलक वर्मा (२), सूर्यकुमार यादव (२३), टीम डेविड (0), पीयुष चावलाने १८ धावा केल्या. गुजरातच्या नूर अहमदने चार षटकात ३७ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तसंच राशीद खानने चार षटकात २७ धावा देत २ विकेट्स घेतल्या. हार्दिक पांड्याने मुंबईचा कर्णधार रोहित शर्माला बाद केलं. मुंबईच्या नेहल वढेरा २१ चेंडूत ४० धावांवर बाद झाला. अर्जुन तेंडुलकर १३ धावा करून तंबूत परतला.

गुजरातच्या फलंदाजांनी मुंबईच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. शुबमन गिलने अप्रतिम फलंदाजी करत अर्धशतकी खेळी केली. मुंबईच्या कुमरच्या गोलंदाजीवर शुबमन ५६ धावांवर बाद झाल्यानंतर अभिनव मनोहरने धडाकेबाज फलंदाजी केली.



अभिनव २० चेंडूत ४२ धावा करून रिलेच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. मात्र, डेविड मिलरने आक्रमक फलंदाजी करून धावसंख्येचा आलेख चढता ठेवला. डेविड मिलरने २२ चेंडूत ४६ धावा कुटल्या. तर राहुल तेवतियाने ५ चेंडूत २० धावांची खेळी साकारली. या धावांच्या जोरावर गुजरात टायटन्सने २० षटकात ६ विकेट्स गमावत २०७ धावांपर्यंत मजल मारली. त्यामुळे मुंबई इंडियन्सला विजयासाठी २०८ धावांचं लक्ष्य गाठावं लागणार होतं.

# जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद लढत

## नेपोम्नियाशी-डिंगची ११व्या डावात बरोबरी

। अस्ताना ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**रशियाचा ग्रँडमास्टर इयान नेपोम्नियाशीने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीत ११व्या डावात झटपट बरोबरी साधून ६-५ अशी आघाडी कायम राखून आपली बाजूही भक्कम केली.**
**ला**



रशियाचा ग्रँडमास्टर इयान नेपोम्नियाशीने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीत ११व्या डावात झटपट बरोबरी साधून ६-५ अशी आघाडी कायम राखून आपली बाजूही भक्कम केली. जागतिक अजिंक्यपद लढतीमध्ये १४ डावांत ७.५ गुण मिळवणारा विजेता ठरतो. नेपोम्नियाशीला यासाठी उर्वरित तीन फेऱ्यांमधून केवळ १.५ गुणांची आवश्यकता आहे. लढतीतील ११वा डाव ३९ चालींनंतरच बरोबरीत सोडवण्यात नेपोम्नियाशी आणि डिंग तयार झाले. हा डाव अवघा १ तास ४० मिनिटे चालला.


पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळणाऱ्या नेपोम्नियाशीने रुय लोपेझच्या 'बर्लिन लाइन' पद्धतीने डावाची सुरुवात केली. सुरुवातीच्या खेळानंतर नेपोम्नियाशी काहीसा विचलित झाला होता; पण डिंगही फार काही पुढाकार घेऊन खेळताना दिसत नव्हता. डाव पुढे जात असताना नेपोम्नियाशीने हळूहळू पुढाकार घेण्यास सुरुवात केली आणि पटावरील आपली स्थिती भक्कम केली.

तुलनेत डिंग अधिक बचावात्मक खेळत गेला आणि त्यामुळे डिंगच्या खेळात एक प्रकारची निष्क्रियता आली...... डावाच्या १५व्या चालीला डिंगने 'सी४' ही मोहऱ्यांची चाल अपेक्षेपेक्षा लवकर खेळली. या चालीपर्यंत नेपोम्नियाशीला फारशी संधी नव्हती. मात्र, या चालीने डिंगचा पटावरील कमकुवतपणा स्पष्ट झाला.

या वेळी पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळणाऱ्या नेपोला डिंगवर अधिक दबाव आणण्याची संधी होती. मात्र, नेपोम्नियाशीने तसे न करता पटावरील स्थिती अधिक सुलभ करण्याचा पर्याय निवडला. त्यानंतर पटावर डाव अखेरच्या टप्प्यात आला आणि त्याच स्थितीत दोघांनी लढत बरोबरीत सोडवण्याचा निर्णय घेतला.

# अर्जुन तेंडुलकर बनू शकतो स्पीडचा बादशाह!

मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरने अलीकडेच इंडियन प्रीमियर लीग कारकिर्दीला सुरुवात केली आहे. मुंबई इंडियन्स वेगवान गोलंदाजी अष्टपैलू अर्जुनने आयपीएल २०२३ मध्ये आतापर्यंत एकूण तीन सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने २ विकेट्स घेतल्या आहेत. अर्जुनने डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी आक्रमणाचे नेतृत्व करण्यापासून आपला ठसा उमटवला आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज ब्रेट ली अर्जुनच्या कामगिरीने खूप प्रभावित झाला आहे. अर्जुन वेगाचा व्यापारी बनू शकतो आणि तो १४० किलोमीटर प्रतितास वेगाने गोलंदाजी करू शकतो, असा त्याचा विश्वास आहे.

हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, "जेव्हा ब्रेट लीला विचारण्यात आले की मुंबईमध्ये खेळताना त्याने कोणत्या बॉलिंग स्पेलमध्ये गोलंदाजी करणे योग्य असेल? कारण त्याची सुरुवातीची फेज आहे.?" त्यावर तो म्हणाला, "मला वाटते की तो सर्व स्पेलमध्ये गोलंदाजी करू शकतो." तो पुढे म्हणाला, "मी अर्जुन तेंडुलकरच्या गोलंदाजीने खूप प्रभावित झालो आहे. मला वाटते की तो मुंबई इंडियन्ससाठी गोलंदाजी करताना जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. त्याची नवीन चेंडूवर गोलंदाजी उत्कृष्ट होत आहे. तो चेंडू अप्रतिम स्विंग करत आहे. अर्जुन मधल्या षटकांसाठी अनुकूल असून जसजसा तो अनुभवी होईल तसतसे अधिक चांगली गोलंदाजी करेल. त्याची डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी वाखाणण्याजोगी आहे."